साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

तिफण

वर्ष १४ वे, अंक - ४ था
जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२३
भाग - ४

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

◆ संपादक ◆
डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार' श्रीराम कॉलनी,हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद - १३१४०३, मो. ९९०४००३९९८

Scanned with OKEN Scanner

भाग - ४ अनुक्रमणिका

अनु क्र.	लेख व लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१५	साहित्यिक यशवंतराव **डॉ. चंद्रकांत बाबुराव कुंभार**	७३-७७
१६	यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार: एक अभ्यास **डॉ. देविदास विक्रम हारगिले**	७८-८४
१७	महाराष्ट्रातील कृषी व औद्योगिक क्रांती आणि यशवंतराव चव्हाण **डॉ. प्रज्ञा भा. कामडी**	८५-९१
१८	अष्टपैलू व्यक्तिमत्व : यशवंतराव चव्हाण **प्रा. डॉ. युवराज देवबा भामरे**	९२-९४
१९	यशवंतराव चव्हाण यांची राजकीय वाटचाल **हनुमंत शेषेराव देवरे**	९५-१००
२०	यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील शैक्षणिक विकासातील योगदान **सहा. प्रा. नांगरे नूतन कृष्णराव**	१०१-१०४
२१	यशवंतराव चव्हाण यांची जडणघडण : विशेष संदर्भ खानापूर तालुका **प्रदीप हणमंत निकम** **डॉ. सुरेंद्र अर्जुन शिरसाट**	१०५-१०७
२२	महाराष्ट्राला लाभलेले अग्रगण्य नेतृत्व : यशवंतराव चव्हाण **डॉ. प्रकाश बुवाजी पांढरमिसे**	१०८-११४
२३	यशवंतराव चव्हाण यांची महाराष्ट्रातील राजकीय वाटचाल **प्रा. प्रमोद अरविंद देसाई**	११५-१२१
२४	यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय वाटचालीतील योगदान **सौ. प्रतिभा विश्वनाथ पांचाळ** **डॉ. ए. एच. कदम**	१२२-१२६
२५	यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्यलेखनाचे वैचारिक मूल्यमापन **प्रवीण सदानंद गायकर**	१२७-१३२
२६	यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य **प्रा. सुनिता पारमित धम्मकिर्ती**	१३२-१३८
२७	आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये यशवंतराव चव्हाण यांची राजकीय वाटचाल **सहा. प्रा. सौ रेश्मा विनायक काळेल**	१३९-१४३

Scanned with OKEN Scanner



१९. यशवंतराव चव्हाण यांची राजकीय वाटचाल

हनुमंत शेषेराव देवरे
संशोधक विद्यार्थी, के. जे. सोमैया महाविद्यालय, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर.

प्रस्तावना

द्विभाषिक मुंबई राज्याचे आणि संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत खूप मोठे योगदान दिले. साडेसहा वर्ष यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले. या काळात त्यांनी महाराष्ट्राला नवी दिशा दिली. महाराष्ट्र राज्याचा सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक विकास घडवून आणला. यशवंतराव चव्हाण यांनी घेतलेल्या निर्णयामुळे महाराष्ट्राचा समतोल विकास झाला. कार्यक्षम प्रशासक, उत्कृष्ट संसदपटू, संयमी राजकारणी, विचारवंत अशी त्यांची ओळख आहे. यशवंतराव चव्हाण रसिक व साहित्यिक होते. त्यांनी युगांतर, सह्याद्रीचे वारे, कृष्णाकाठ, ऋणानुबंध ही त्यांची साहित्यसंपदा आहे. अतिशय सर्वसामान्य कुटुंबात जन्माला आलेले यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ते देशाच्या उपपंतप्रधान पदापर्यंतचा प्रवास थक्क करणार आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना सहकार चळवळ, लोकशाही विकेंद्रीकरणासाठी पंचायती राज व्यवस्थेची निर्मिती, कृषी-औद्योगिक समाज रचना अशा काही चळवळींच्या माध्यमातून महाराष्ट्राला दिशा दिली. महाराष्ट्र राज्याचे निर्मिती झाली तेव्हा विदर्भ, मराठवाडा, कोकण या प्रदेशाचा विकास झाला नव्हता, त्यांनी सर्व प्रदेशाचा समतोल विकासासाठी प्रयत्न केले.

यशवंतराव चव्हाण विद्यार्थी दशेत असताना त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला. त्यांनी काही वर्ष तुरुंगवास भोगला. त्यानंतरच्या काळात ते काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून सक्रिय राजकारणात आले. 1946 मध्ये पहिल्यांदा मुंबई विधिमंडळावर निवडून आले आणि गृहमंत्र्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषावर प्रांत रचना झाली. मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे महाराष्ट्र राज्य स्थापन व्हावे अशी मागणी होती, पण ती मागणी मान्य झाली नाही आणि नोव्हेंबर 1956 रोजी द्विभाषिक मुंबई राज्याचे स्थापना झाली. यशवंतराव चव्हाण द्विभाषिक राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले. त्यानंतर एक मे 1960 मध्ये संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि यशवंतराव चव्हाण पुन्हा संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्री पदाच्या काळात त्यांनी लोकशाही विकेंद्रीकरण, कृषी, उद्योग, सहकार, शिक्षण या क्षेत्रात भरीव काम केले. यशवंतराव चव्हाण यांचा महाराष्ट्रच नव्हे तर देशाच्या विकासात मोलाचा वाटा आहे. 1962 चीनच्या आक्रमणानंतर तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी संरक्षणमंत्री पदाची जबाबदारी यशवंतरावांवर सोपवली. हा त्यांच्या राजकीय कारकीर्दीचा सर्वोच्च बिंदू होता. यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री झाल्यावर त्यांनी लष्कराचे आधुनिकीकरण केले. त्यामुळे त्यांचे मनोधैर्य उंचावलं तसेच भारतीय लष्कर आणि सरकार यामध्ये समन्वय घडवून आणला. यशवंतरावांनी भारतीय सैन्यात समर्पण, आत्मविश्वासाची भावना निर्माण केली. परिणामी 1965 आणि 1971 भारत- पाकिस्तान युद्धात भारताला विजय प्राप्त झाला. त्यानंतरच्या काळामध्ये यशवंतराव चव्हाण यांनी केंद्र सरकार मध्ये विविध पदे भूषवली त्यामध्ये 1966 गृहमंत्री, 1970 अर्थमंत्री, 1974 परराष्ट्रमंत्री तसेच चरणसिंग यांच्या मंत्रिमंडळामध्ये यशवंतराव

Scanned with OKEN Scanner

चव्हाण काही काळ उपपंतप्रधान म्हणून कार्यरत होते. या शोधनिबंधातून यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय वाटचालीचा आढावा घेतला आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी द्वितीय साधनांचा अवलंब करण्यात आला आहे त्यामध्ये पुस्तके, विविध मासिके, लेख, वर्तमानपत्रे इत्यादी.

संशोधनाची उद्दिष्टे

1. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कारकीर्दीचा आढावा घेणे.
2. यशवंतराव चव्हाण यांची महाराष्ट्राच्या राजकारणातील भूमिका समजून घेणे.
3. देशाच्या राजकारणातील यशवंतराव चव्हाण यांचे स्थान अभ्यासणे.

ज्य पातळीवरील यशवंतराव चव्हाण यांची राजकीय कारकीर्द

यशवंतराव चव्हाण स्वातंत्र्य चळवळीकडे शालेय जीवनापासूनच आकर्षित झाले होते. देशात महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाची चळवळ चालू होती, या चळवळीत यशवंतराव चव्हाण सहभागी झाले. त्यांनी शाळेच्या आवारात असणाऱ्या झाडावर तिरंगा फडकवला, त्यामुळे त्यांना कारावास भोगावा लागला. कारागृहात असताना अनेक देशभक्तांचा सहवास त्यांना लाभला त्यामुळे त्यांचा स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग वाढतच गेला. 1942 मध्ये यशवंतराव चव्हाण यांची सातारा जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली इथून पुढे त्यांनी सक्रिय राजकारणात स्वतःला झोकून दिले. 1942 साली काँग्रेसने भारत छोडो आंदोलनाची घोषणा केली. यशवंतराव चव्हाण या आंदोलनात सहभागी झाले होते. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात खऱ्या अर्थाने 1946 पासून झाली ते दक्षिण सातारा मतदारसंघातून मुंबई प्रांताच्या विधानसभेवर निवडून आले. त्यानंतर त्यांची नेमणूक मुंबई प्रांताच्या गृहमंत्र्याचे संसदीय सचिव (पार्लमेंटरी सेक्रेटरी) म्हणून झाली. बाळासाहेब खेर मुख्यमंत्री असताना त्यांनी ब्राह्मणेत्तर नेत्यांचा मंत्रिमंडळात समावेश केला नाही त्यामुळे काँग्रेसमधील एक गट बाहेर पडून त्यांनी 'शेतकरी कामगार पक्षाची' 1948 मध्ये स्थापना केली. या पार्श्वभूमीवर 1952 च्या निवडणुका पार पडल्या त्यामध्ये काँग्रेसचे उमेदवार मोठ्या प्रमाणावर विजयी झाले. काँग्रेसला हे यश मिळवून देण्यात यशवंतराव चव्हाण यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. विधानसभेच्या निवडणुकीनंतर मोरारजी देसाई मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. देसाईंच्या मंत्रिमंडळात यशवंतराव चव्हाण नागरी पुरवठा, समाज कल्याण आणि वन खात्याचे राज्यमंत्री होते. या पदावर असताना यशवंतरावांनी त्यांचे प्रशासकीय कसब दाखवून दिले. त्यानंतर त्यांच्यावर अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सोपवल्या. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात भाषावार प्रांतरचनेची मागणी जोर धरू लागली होती. महाराष्ट्रामध्ये त्यासाठी 1953 मध्ये संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना झाली. मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे राज्य स्थापन व्हावे अशी मागणी होऊ लागली, परंतु काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने ही मागणी मान्य केली नाही.आणि मराठी आणि गुजराती भाषा बोलणाऱ्या लोकांचे द्विभाषिक मुंबई राज्य 1 नोव्हेंबर 1956 मध्ये स्थापन झाले.

Scanned with OKEN Scanner

यशवंतराव चव्हाण द्विभाषिक राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून विराजमान झाले. द्वैभाषिक राज्यावरून मराठी भाषिक जनतेमध्ये मोरारजी देसाई यांच्या विरोधात प्रचंड संतापाची भावना उसळली आणि मुंबईत दंगली झाल्या. तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्या प्रशासनाने दंगलीवर गोळीबार केला, त्यामध्ये 105 व्यक्ती मृत्युमुखी पडले. त्यामुळे त्यांना मुख्यमंत्रीपद सोडावे लागले होते. 1957 मध्ये सार्वत्रिक निवडणुका झाल्या त्यामध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीला खूप मोठे यश प्राप्त झाले, कारण जनता ही द्वैभाषिक राज्याच्या विरोधात होती. त्यानंतर यशवंतराव चव्हाण यांनी पंडित नेहरूंना तसेच इंदिरा गांधींना द्वैभाषिक राज्य ऐवजी स्वतंत्र मराठी भाषिकांच्या राज्याची आवश्यकता पटवून सांगितली. आणि स्वतंत्र महाराष्ट्राची निर्मिती करण्यामध्ये मोलाची भूमिका पार पाडली. मुंबईसह महाराष्ट्र राज्यातील निर्मिती 1 मे 1960 रोजी झाली आणि महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचेच नियुक्ती झाली. त्यांच्या या मुख्यमंत्री पदाच्या काळात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आणि आणि महाराष्ट्र राज्याचा विकास घडवून आणला.

लोकशाही विकेंद्रीकरण

महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील स्वराज (विकेंद्रीत ग्रामराज्य) निर्माण करण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. त्यांच्या आदर्श राज्याच्या कल्पनेत आर्थिक आणि राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण करून स्वयंपूर्ण व स्वयंशासित गावाच्या पायावर राज्याची उभारणी करणे त्यांना अभिप्रेत होते. खेडे विकासाचे केंद्र मानून लोकशाही गावापर्यंत नेण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरू ही आग्रही होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर लोकशाही विकेंद्रीकरणासाठी 1957 मध्ये बलवंतराय मेहता समितीची स्थापना केली. या समितीच्या शिफारशीनुसार देशातील अनेक राज्यांनी पंचायत राज व्यवस्थेचा स्वीकार केला. परंतु यशवंतराव चव्हाण यांना त्यात काही त्रुटी जाणवत होत्या, त्यानुसार महाराष्ट्रात त्यांनी वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली यशवंतरावांनी स्वतःच्या सूचना आणि काही आग्रह होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्याने 1 मे 1962 पासून त्रिस्तरीय पंचायती राज व्यवस्था लागू केली. यशवंतराव चव्हाण यांचा अनुभव महाराष्ट्राला उत्तम पंचायती राजव्यवस्था देण्यात कामी आला. या पंचायत राज व्यवस्थेतून स्थानिक नेतृत्वाचा उदय झाला उच्चवर्गीय किंवा धनादेश लोकच राजकीय नेतृत्व करू शकतात हा समज मोडीत निघाला. सत्तेचे विकेंद्रीकरण प्रक्रियेतून मोठे झालेल्यांनी पुढे महाराष्ट्राचे नेतृत्व केलं.

कृषी आणि औद्योगिक धोरण

कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र कायमच अग्रेसर राहिला आहे. याची पायाभरणी यशवंतराव चव्हाण यांनी सुरुवातीच्या काळात केली होती. त्यामुळेच सहकार कृषी आणि उद्योग यासाठी त्यांनी घेतलेले निर्णय महत्त्वाचे मानवे लागतील. शेती क्षेत्राच्या बाबतीत यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात कुळ कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी केली, त्यामुळे अनेक भूमिहीनांना जमिनी मिळाल्या. 1961 सालचा कमाल जमीन अधिग्रहण कायदा यामुळे समाजातील सर्व वर्गांकडे जमिनीचा वाटप झालं. महाराष्ट्रात जमीन धारणेचे प्रमाण कमी, जमिनीचे तुकडीकरण तसेच बागायती शेतीच्या तुलनेत कोरडवाहू शेतीचे क्षेत्र फार मोठे होते. अशा स्थितीत शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी यशवंतरावांनी कृषी आधारित औद्योगीकरणाची कल्पना मांडली आणि त्याला सहकाराची ही जोड दिली. काळाच्या ओघात महाराष्ट्र राज्य कृषी प्रधान व्यवस्थेकडून उद्योग आधारित अर्थव्यवस्थेकडे गेलं.

Scanned with OKEN Scanner

सहकार चळवळ ही आर्थिक विकासासाठी सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक आहे हे यशवंतरावांना माहीत होतं. सहकाराद्वारे कारखाने, कृषी उद्योग स्थापन करून गरीबी हटवण्याच्या कार्यक्रमास चव्हाणांनी वेग दिला. त्यांनी सहकारला कायद्याचे आणि संस्थात्मक बळ दिले. त्या धोरणामुळेच राज्यात सहकारी औद्योगिक वसाहती तयार झाल्या. त्याचबरोबर महाराष्ट्रभर सहकारी चळवळ पसरली आणि वेगवेगळे सहकारी उद्योग निर्माण झाले. यशवंतरावांच्या काळात नवीन अठरा सहकारी साखर कारखाने सुरू झाले त्यामुळे शेती क्षेत्र विकास पावले.

शैक्षणिक धोरण

ग्रामीण भागातील बहुसंख्य बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होता. त्यांच्या शिक्षणात अनेक अडथळे होते. त्यापैकी शैक्षणिक शुल्क हा एक प्रमुख अडथळा होता. बहुजन समाज मोठ्या प्रमाणात शिक्षणाच्या प्रवाहात आला पाहिजे या उदात्त हेतूने आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी इ. बी. सी. सवलत यशवंतराव चव्हाण यांनी सुरू केली. महाराष्ट्रातील औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठ आणि कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना यशवंतरावांनी केली. त्यांनी औरंगाबाद, कराड येथे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले. तसेच सातारा येथील सैनिकी स्कूलमध्ये एन.डी.ए. शिक्षणाची सोय त्यांनी उपलब्ध करून दिली. शिक्षणापासून वंचित असा घटक म्हणजे आदिवासी या आदिवासींसाठी आश्रम शाळा उभारल्या.

राष्ट्रीय राजकारणात यशवंतराव चव्हाण यांचे योगदान

चीनने 1962 मध्ये भारतावर आक्रमण केले. या काळात भारताचे संरक्षण मंत्री कृष्णमेनन यांनी राजीनामा दिला. अशा वेळी भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना संरक्षण मंत्री पदाची जबाबदारी दिली. त्यांनी हे पद चार वर्षे सांभाळलं. याच काळात भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये 1965 युद्ध घडून आले. या युद्धात यशवंतराव चव्हाण यांच्या कणखर भूमिकेमुळे पाकिस्तानचा पराभव करण्यात भारताला यश प्राप्त झाले आणि त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची प्रतिमा उंचावली. चीनच्या युद्धानंतर भारतीय सैन्याची स्थिती मजबूत करण्यासाठी यशवंतरावांनी प्रयत्न केले. संरक्षण खात्याला अधिक निधी प्राप्त करून घेतला. भारतीय सैन्याचे आधुनिकीकरण करायला सुरुवात केली. अमेरिका आणि इंग्लंड यांच्यावर अवलंबून न राहता रशियाच्या मदतीने नवीन शास्त्रास्त्र निर्मिती करण्याच निश्चित केलं. 1961- 62 सालच्या अंदाजपत्रकात संरक्षण खात्याचा खर्च 300 कोटी होता म्हणजेच तो एकूण सरकारी प्राप्तीच्या 28 टक्के इतका होता. 1962- 63 मध्ये हाच खर्च 25 टक्के इतका खाली आला. 1963- 64 च्या अंदाजपत्रकात संरक्षण खात्यावरील खर्च 867 कोटी पर्यंत वाढला म्हणजेच सरकारी उत्पन्नाच्या 41 टक्के इतका झाला. कृष्णमेनन यांच्या काळात समन्वयाचा अभाव होता यशवंतरावांनी तिन्ही सैन्य दलामध्ये आणि सरकारमध्ये समन्वय घडून आणला. चीनच्या युद्धात जरी भारताला नामुष्की पत्करावी लागली असली तरी पुढील दोन वर्षात सैन्याचे नैतिक बळ, शिक्षण आणि आधुनिक हत्यारे या दृष्टीने परिस्थिती खूपच सुधारली होती. या सर्व गोष्टींचे श्रेय यशवंतरावांना दिले जाते. पाकिस्तानी युद्धानंतर ताश्कंद करार झाला. ताश्कंद कराराच्या वेळी लाल बहादूर शास्त्रांचे निधन झाले. शास्त्रींच्या निधनानंतर यशवंतराव चव्हाण यांना पंतप्रधान होण्याची संधी होती, परंतु या संधीचा त्यांना उपयोग करून घेता आला नाही.

Scanned with OKEN Scanner

पंतप्रधान लहान बहादूर शास्त्री यांच्या आकस्मित निधनानंतर देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती. अशा काळात देशाच्या गृहमंत्री पदाची जबाबदारी यशवंतराव चव्हाण यांच्याकडे 1966 मध्ये देण्यात आली. त्यावेळी देश अनेक संकटांमधून जात होता अशा नाजूक परिस्थितीत गृहमंत्री म्हणून त्यांनी योग्य आणि खंबीर भूमिका घेतली. भाषावाद, स्वायत्तता प्रश्न, हिंदू-मुस्लीम जातीय दंगली, नक्षलवाद अशा परिस्थितीवर त्यांनी कार्यक्षमतेने व कौशल्यपूर्ण पद्धतीने या सर्व संकटांवर मात केली. 1967 मध्ये सार्वत्रिक निवडणुका झाल्या त्यानंतर आठ राज्यांमध्ये काँग्रेस विरोधी सरकारी सत्तेवर आली. अशा परिस्थितीत केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांच्यामध्ये यशवंतरावांनी समन्वय घडवून आणला.

1970 ते 74 या काळात यशवंतराव चव्हाण भारताचे वित्तमंत्री होते. वित्तमंत्री म्हणून त्यांचा प्रवास थोडा निराजनक ठरला. कारण त्या कालची परिस्थिती त्याला कारणीभूत ठरली. 1971 मध्ये भारत-पाकिस्तान (बांगलादेश निर्मिती) युद्ध झाले. तसेच 1972 मध्ये भारतात मोठा दुष्काळ पडला होता. जागतिक स्तरावर ऑइल च्या किमतीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली होती. त्यामुळे देशात महागाईने उच्चांक गाठला होता. महागाईमुळे भारतातील लोक भरडली जात होती. देशात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. पी एल 480 या कायद्याअंतर्गत अमेरिकेमधून गहू आयात केला. आयातीमुळे देशातील आंतरराष्ट्रीय व्यापार प्रतिकूल झाला. या सर्व अडचणींवर यशवंतराव चव्हाण यांनी मात करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी देशातील महागाई नियंत्रणात आणण्यासाठी आर्थिक प्रश्नांचा विस्तृत अभ्यास करून अर्थ मंत्रालय पातळीवर नियोजन केले. देशाची अर्थव्यवस्था कमकुवत झाल्यामुळे त्यांनी संस्थानिकांचे तनखे बंद केले. यशवंतराव चव्हाण यांनी अर्थव्यवस्थेला देण्यासाठी अनेक महत्त्वाचे कायदे मंजूर केले. त्याचबरोबर देशातील करदात्यांचे प्रमाण वाढवून कर चुपकेगिरीवर नियंत्रण प्रस्थापित केले.

परराष्ट्रमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची 1974 मध्ये निवड करण्यात आली. परराष्ट्रमंत्री पदाच्या कार्यकाळात भारताच्या परराष्ट्र धोरणाची आखणी करताना सांस्कृतिक परंपरा व स्वतंत्र संग्रामाचा वारसा जपण्याचे कार्य त्यांनी केले. यशवंतराव चव्हाण यांनी भारत आणि भारताच्या शेजारी देश यांच्याबरोबर सहकार्य वाढवण्यासाठी पुढाकार घेतला. विकसनशील राष्ट्रांबरोबर सहानुभूती ठेवून विकसित राष्ट्राच्या व्यवहारात भारताच्या दृष्टीने अनुकूल बदल घडून आणण्यासाठी ते प्रयत्नशील राहिले. 1975 मध्ये इंदिरा गांधी यांनी राष्ट्रीय आणीबाणी जाहीर केली. त्यावेळी इंदिरा गांधींना पक्षांतर्गत विरोध झाला. मात्र यशवंतराव चव्हाण सरकारमध्ये स्थिर राहिले. 1977 ला काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव झाला. काँग्रेस विरोधी लाटेत इंदिरा गांधी ही निवडून येऊ शकल्या नाहीत. परिणामी संसदेत त्या काळात काँग्रेस हा सर्वात मोठा विरोधी पक्ष असल्याने स्वाभाविकपणे यशवंतराव चव्हाण यांची विरोधी पक्षनेते या पदावर वर्णी लागली. 1978 मध्ये काँग्रेसचे विभाजन झाले इंदिरा काँग्रेस आणि देवराज ऊर्स काँग्रेस असे दोन गट पडले. जनता सरकारमध्ये संघर्ष सुरू झाला मोरारजी देसाई यांना पंतप्रधान पदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर पंतप्रधान म्हणून चरणसिंग यांची निवड झाली. त्या सरकारला ऊर्स काँग्रेसचा पाठिंबा होता यशवंतराव चव्हाण हे ऊर्स काँग्रेसमध्ये होते. या काळात यशवंतराव चव्हाण हे खूप कमी काळासाठी भारताचे उपपंतप्रधान राहिले. 1980 मध्ये लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुका घेण्यात आल्या त्यात यशवंतराव चव्हाण काँग्रेस एस तर्फे सातारा लोकसभा मतदारसंघातून इंदिरा काँग्रेस पक्षाच्या शालिनीताई पाटील यांचा

Scanned with OKEN Scanner

पराभव करून विजयी झाले. त्यानंतरच्या काळात यशवंतराव चव्हाण यांनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि 1982 मध्ये आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली.

समारोप

यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कारकीर्दीमध्ये त्यांनी अनेक महत्त्वाचे पदे भूषवली. ते द्विभाषिक मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री होते. तसेच 1960 साली स्थापन झालेल्या स्वतंत्र महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली होती. त्यांनी केंद्र सरकारमध्ये वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. 1962 च्या चीन युद्ध नंतर त्यांची भारताच्या संरक्षण मंत्रीपदी नियुक्ती झाली. त्यानंतर भारताचे गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, तसेच चरण सिंग सरकारच्या काळात उपपंतप्रधानपद त्यांनी सांभाळले. या काळात त्यांनी महाराष्ट्र तसेच देशाच्या विकासात मोलाचे योगदान दिले.

संदर्भ

1. भोळे भा.ल. (2007) यशवंतराव चव्हाण: राजकारण आणि साहित्य; साकेत प्रकाशन.
2. कायंदे-पाटील गंगाधर (2001) यशवंतराव चव्हाण; चैतन्य पब्लिकेशन.
3. कुलकर्णी भालचंद्र (2012) सहकार सुगंध, यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी विशेषांक; एकविरा प्रकाशन.
4. पाटील संतोष (2019) सहकार चळवळीचा विश्लेषणात्मक अभ्यास; पुणे रिसर्च टाइम्स.
5. चव्हाण यशवंतराव (1984) कृष्णाकाठ, आत्मचरित्र खंड-1; प्रेस्टीज प्रकाशन.
6. चव्हाण यशवंतराव (1962) सह्याद्रीची वारे, भाषण संग्रह; प्रकाशन विभाग, महाराष्ट्र राज्य.

Scanned with OKEN Scanner